# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
## कृषि नगर, अकोला (महाराष्ट्र) ४४४ १०४

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक कृषिवि-३७२३/प्र.क्र.१६९/६-अे, दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२४

## जाहीरात

**क्र. बीएमसी/जाहिरात/प्र.ग्र./२०२५/३८१०** **दिनांक :- २५ फेब्रुवारी, २०२५**

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या कृषि विद्यापीठातील **गट-ड** संवर्गातील एकुण रिक्त पदांपैकी ५० टक्के रिक्त पदे केवळ त्याच कृषि विद्यापीठाचे बाधित प्रकल्पग्रस्तांमधुन भरण्याकरीता विशेष भरती प्रक्रिया राबविण्यास एक विशेष बाब म्हणुन परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला करिता ज्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रत्यक्षात जमिनी संपादित केलेल्या आहेत, अशा प्रकल्पबाधित कुटूंबामधुन प्रकल्पग्रस्तांचा सरळसेवेचा अनुशेष भरून काढण्याकरीता विशेष भरती मोहिमे अंतर्गत पात्र उमेदवारांकडुन **www.pdkv.ac.in** या संकेतस्थळावरील लिंकवर ऑनलाईन पध्दतीने **दिनांक १० एप्रिल, २०२५** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

oin Megabharti _ 7500

**पदाचे नांव :- १. प्रयोगशाळा परिचर एकुण ३९ पदे वेतन श्रेणी - एस ६ : १९९००-६३२००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | ०६ | ०४ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०८ | ०४ | ०४ | ०९ | ३९ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे** | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | ०३ | ०३ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०३ | ०३ | ०४ | २४ |
| **महिला** | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | १० |
| **खेडाळु** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| **माजी सैनिक** | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०३ |
| **पदविधर अंशकालीन कर्मचारी** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| **भुकंपग्रस्त** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| **दिव्यांग** | ०१ पदे – स्वमग्नता (Austism Spectrum Disorder) (M-Mild, MoD-Moderate), ID-Intellectual Disability, विशिष्ट शिक्षण अक्षमता (Special Learning Disability), मानसिक आजार (Mental Illness), तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यागंत्व | | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| अनाथ | ०० |

पदाचे नांव :- २. परिचर एकुण ८० पदे वेतन श्रेणी - एस १ : १५०००-४७६००

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ११ | ०७ | ०४ | ०२ | ०४ | ०२ | ०० | १७ | ०८ | ०८ | १७ | ८० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०६ | ०३ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ०० | ०७ | ०४ | ०४ | ०७ | ४१ |
| महिला | ०३ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०५ | ०२ | ०२ | ०५ | २१ |
| खेडाळु | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| माजी सैनिक | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०८ |
| पदविधर अंशकालीन कर्मचारी | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०८ |
| भुकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग | ०२ पदे - D-Deaf, HH-Hearing Handicapped (कर्णबधीर) या प्रकाराकरीता<br>०१ पदे – स्वमग्नता (Austism Spectrum Disorder) (M-Mild, MoD-Moderate), ID-Intellectual Disability, विशिष्ट शिक्षण अक्षमता (Special Learning Disability), मानसिक आजार (Mental Illness), तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यागंत्व | | | | | | | | | | | |
| अनाथ | ०१ पद - शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का.३/, दिनांक ०६.०४.२०२३ मधील निर्देशानुसार उपलब्ध एकुण ८० पदांवर ०१ पद आरक्षित | | | | | | | | | | | |

oin Megabharti _7500

पदाचे नांव :- ३. चौकीदार एकुण ५० पदे वेतन श्रेणी - एस १ : १५०००-४७६००

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०३ | ०३ | ०२ | ०० | ०३ | ०१ | ०१ | १० | ०५ | ०५ | १७ | ५० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०२ | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०५ | ०३ | ०३ | ०७ | २८ |
| महिला | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०३ | ०१ | ०१ | ०५ | १३ |
| खेडाळु | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| माजी सैनिक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०५ |
| पदविधर अंशकालीन कर्मचारी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०३ |
| भुकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग | ०१ पदे - B-Blind, LV-Low Vision (अंध/अपदृष्टी) या प्रकाराकरीता<br>०१ पदे - D-Deaf, HH-Hearing Handicapped (कर्णबधीर) या प्रकाराकरीता | | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| अनाथ | ०० |

| पदाचे नांव :- ४. ग्रंथालय परिचर एकुण ०५ पदे वेतन श्रेणी - एस १ : १५०००-४७६०० | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
| पदसंख्या | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०५ |
| महिला | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेडाळु | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| माजी सैनिक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| पदविधर अंशकालीन कर्मचारी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भुकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग | ०० | | | | | | | | | | | |
| अनाथ | ०० | | | | | | | | | | | |

oin Megabharti _7500

| पदाचे नांव :- ५. व्हॉलमन एकुण ०२ पदे वेतन श्रेणी - एस ३ : १६६००-५२४०० | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
| पदसंख्या | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| महिला | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेडाळु | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| माजी सैनिक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| पदविधर अंशकालीन कर्मचारी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भुकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग | ०० | | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| अनाथ | ०० |

| पदाचे नांव :- ६. माळी एकुण ०८ पदे वेतन श्रेणी - एस १ : १५०००-४७६०० | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
| पदसंख्या | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०८ |
| महिला | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेडाळु | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| माजी सैनिक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| पदविधर अंशकालीन कर्मचारी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भुकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग | ०० | | | | | | | | | | | |
| अनाथ | ०० | | | | | | | | | | | |

Join Megabharti_7500

| पदाचे नांव :- ७. मत्स्यसहायक एकुण ०१ पदे वेतन श्रेणी - एस १ : १५०००-४७६०० | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
| पदसंख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| महिला | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेडाळु | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| माजी सैनिक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| पदविधर अंशकालीन कर्मचारी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भुकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग | ०० | | | | | | | | | | | |

| अनाथ | ०० | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदाचे नांव :- ८. मजुर एकुण ३४४ पदे वेतन श्रेणी - एस ३ : १५०००-४७६००** | | | | | | | | | | | |
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **विजा-अ** | **भज-ब** | **भज-क** | **भज-ड** | **विमाप्र** | **इमाव** | **साशैमाव** | **आदुघ** | **खुला** | **एकुण** |
| **पदसंख्या** | ४४ | २६ | ११ | ०६ | १३ | ०८ | ०७ | ६९ | ३५ | ३५ | ९० | ३४४ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे** | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | १८ | ११ | ०६ | ०३ | ०६ | ०४ | ०३ | २७ | १४ | १४ | ३५ | १४१ |
| **महिला** | १३ | ०८ | ०३ | ०२ | ०४ | ०२ | ०२ | २१ | १० | १० | २७ | १०२ |
| **खेडाळु** | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ०२ | ०२ | ०४ | १४ |
| **माजी सैनिक** | ०६ | ०४ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | १० | ०५ | ०५ | १३ | ४९ |
| **पदविधर अंशकालीन कर्मचारी** | ०४ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०३ | ०३ | ०९ | ३२ |
| **भुकंपग्रस्त** | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| **दिव्यांग** | एकुण १४ पदे<br>०४ पदे - B-Blind, LV-Low Vision (अंध/अपदृष्टी) या प्रकाराकरीता<br>०४ पदे - D-Deaf, HH-Hearing Handicapped (कर्णबधीर) या प्रकाराकरीता<br>०३ पदे - OA-One Arm, OL-One Leg, BL-Both Leges, OAL-One Arm and One Leg, CP-Cerebral Palsy, LC-Leprosy Cured, Dw-Dwarfism, AAV-Acid Attack Victim (अस्थिव्यंगता) या प्रकाराकरिता<br>०३ पदे – स्वमग्नता (Austism Spectrum Disorder) (M-Mild, MoD-Moderate), ID-Intellectual Disability, विशिष्ट शिक्षण अक्षमता (Special Learning Disability), मानसिक आजार (Mental Illness), तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यागंत्व | | | | | | | | | | | |
| **अनाथ** | ०३ पद - शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का.३/, दिनांक ०६.०४.२०२३ मधील निर्देशानुसार उपलब्ध एकुण ३४४ पदांवर ०३ पदे आरक्षित | | | | | | | | | | | |

oin Megabharti 7500

**संक्षिप्त** :- अजा - अनुसूचित जाती, अज - अनुसूचित जमाती, विजा-अ - विमुक्त जाती, भज - भटक्या जमाती, विमाप्र **-** विशेष मागास प्रवर्ग, इमाव - इतर मागास प्रवर्ग, आदुघ -आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, साशैमाव - सामाजिक व शैक्षणीक मागास प्रवर्ग व खुला

**१. शैक्षणीक अर्हता व परिक्षा पध्दती खालीलप्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **पदाचे नांव/वेतनश्रेणी** | **किमान शैक्षणीक अर्हता** | **परिक्षा पध्दती** |
|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा परिचर | माध्यमीक शालान्त परिक्षा उत्तीर्ण | मराठी - ५०<br>इंग्रजी - ५०<br>सामान्य ज्ञान - ५०<br>बौध्दीक चाचणी - ५०<br>एकुण - २०० गुणांची परिक्षा (१०० प्रश्न) |
| २ | परिचर | माध्यमीक शालान्त परिक्षा उत्तीर्ण | मराठी - ५०<br>इंग्रजी - ५०<br>सामान्य ज्ञान - ५०<br>बौध्दीक चाचणी - ५०<br>एकुण - २०० गुणांची परिक्षा (१०० प्रश्न) |
| ३ | चौकीदार | १. इयत्ता ०७ वी उत्तीर्ण, | ६० गुणांची व्यावसायिक चाचणी व ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सुदृढ प्रकृती असणारा<br>२. माजी सैनिकांना प्राधान्य | गुणांची शारिरीक क्षमता चाचणी. |
| ४ | ग्रंथालय परिचर | १. माध्यमीक शालान्त परिक्षा उत्तीर्ण.<br>२. शासन मान्यताप्राप्त संस्थेकडुन ग्रंथालय शास्त्र प्रमाणपत्र किमान तीन महिने मुदतीचा अभ्यासक्रम पुर्ण करणे आवश्यक | मराठी - ५०<br>इंग्रजी - ५०<br>सामन्य ज्ञान - ५०<br>बौध्दीक चाचणी - ५०<br>एकुण - २०० गुणांची परिक्षा (१०० प्रश्न) |
| ५ | माळी | कृषि विद्यापीठ मान्यताप्राप्त संस्थेचा एक वर्ष कालावधीचा माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण. | ६० गुणांची व्यावसायिक चाचणी व ४० गुणांची शारिरीक क्षमता चाचणी. |
| ६ | मजुर | इयत्ता ४ थी उत्तीर्ण व संबंधित क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य | ६० गुणांची व्यावसायिक चाचणी व ४० गुणांची शारिरीक क्षमता चाचणी. |
| ७ | व्हॉलमन | माध्यमीक शालान्त परिक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष | मराठी - ५०<br>इंग्रजी - ५०<br>सामान्य ज्ञान - ५०<br>बौध्दीक चाचणी - ५०<br>एकुण - २०० गुणांची परिक्षा (१०० प्रश्न)<br>सदर पदाची परिक्षा ऑनलाईन पध्दतीने राहील. |
| ८ | मत्स्यसहायक | १. इयत्ता ०४ थी उत्तीर्ण<br>२. राज्य मत्स्य विभागाचे फ्रेश वॉटर फिशकल्वर प्रमाणपत्र | ६० गुणांची व्यावसायिक चाचणी व ४० गुणांची शारिरीक क्षमता चाचणी. |

oin Megabharti _7500

प्रयोगशाळा परिचर, परिचर, ग्रंथालय परिचर व व्हॉलमन या पदांची ऑनलाईन पध्दतीने वस्तुनिष्ठ बहु पर्यायी स्वरूपात आयोजीत करण्यात येईल. तसेच त्यांचेबाबत वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये अचूक उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या अंतिम गुणांसाठी विचारात घेतली जाईल. प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**२. वयोमर्यादा**

| वयोमर्यादा गणना दिनांक | किमान वय | कमाल वयोमर्यादा (सदरची जाहिरात प्रकल्पग्रस्तांसाठी असल्यामुळे खालील प्रवर्ग सोडुन इतर प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | | | पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार |
| | | अराखीव प्रवर्ग | राखीव प्रवर्ग | दिव्यांग | |
| ३१-०३-२०२५ | १८ वर्षे | ३८ + सशस्त्र दलातील सेवेचा कालावधी अधिक ०३ वर्षे | ४३ + सशस्त्र दलातील सेवेचा कालावधी अधिक ०३ वर्षे | ४५ | ५५ |

वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माला दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी.) शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय किंवा अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल. उपरोक्त वयोमर्यादा ही सदर जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास विचारात घेण्यात येईल.

**३. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक व पध्दत :-**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **दिनांक** |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज/आवेदन पत्र व परिक्षा/भरती प्रक्रिया शुल्क भरण्याची लिंक सुरूवात दिनांक | १० मार्च, २०२५ |
| २. | ऑनलाईन अर्ज/आवेदन पत्र व परिक्षा/भरती प्रक्रिया शुल्क भरण्याची अंतिम दिनांक | १० एप्रिल, २०२५ |

१. पात्र उमेदवाराने विद्यापीठाचे www.pdkv.ac.in या संकेतस्थळावर खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करून Online अर्ज सादर करावा.

२. प्रस्तुत पदांसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेला अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

३. ऑनलाईन अर्जाची लिंक उपलब्ध होण्याचा दिनांक उपरोक्त दिलेल्या वेळापत्रकानुसार राहील.

४. उमेदवाराने संपुर्ण जाहिरातीचे वाचन करूनच अर्ज भरावा. संपुर्ण भरलेला अर्ज Submit केल्यानंतर त्या अर्जाची Printout काढावी. सदरील अर्ज उमेदवाराने स्वत:जवळ निवड प्रक्रियेसाठी जतन करून ठेवावा. सदरील अर्ज व शैक्षणीक कागदपत्रे या कार्यालयात पोस्टाने पाठवु नये.

oin Megabharti _7500

१ परीक्षा शुल्क ना-परतावा आहे.

२ परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

३ माजी सैनिक/दिव्यांग उमेदवार यांना परिक्षा/भरती प्रक्रिया शुल्कात सूट देण्यात येत आहे.

**४. परीक्षा पध्दती / परीक्षेचे स्वरूप**

१ ऑनलाईन परिक्षा, व्यावसायीक चाचणी व शाररीक क्षमता चाचणी इत्यादीबाबतचे स्वरूप शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२ मध्ये विहीत केल्यानुसार राहिल.

**५. परीक्षा/भरती प्रक्रिया शुल्क**

| **अ.क्र.** | **प्रवर्ग** | **आवश्यक शुल्क** |
|---|---|---|
| १ | अराखीव (खुला) प्रवर्ग | ५००/- रू. |
| २ | मागास प्रवर्ग/आर्थिक दुर्बल घटक/अनाथ | २५०/- रू. |

**<u>समांतर आरक्षणाबाबत सर्वसाधारण तरतुदी</u>**

**६. महिला आरक्षण**

१ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत नमुद करणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट महिला व बाल विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ४ मे, २०२३ नुसार रद्द करण्यात आली आहे. तथापी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील

1 महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गातील इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागु राहतील.

२ शासन निर्णय क्र.८२/२००१ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.०५.२००१ नुसार महिलांसाठीचे आरक्षण हे ज्या प्रवर्गात दर्शविण्यात आले आहे त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षण अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांमधुन पदे भरण्यात येतील. आरक्षणाचा अनुशेष शिल्लक राहणार नाही.

**७. खेळाडू आरक्षण**

१ प्राविण्य प्राप्त खेडाळु व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रिडा विषयक विहीत अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रामाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे असणे बंधनकारक आहे.

२ खेडाळु प्रवर्गातुन निवडीस पात्र असलेल्या उमेदवारांची क्रिडा प्रमाणपत्रे पुनःपडताळणीसाठी उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, पुणे यांचेकडे पाठविण्यात येतील आणि त्यांचे कडुन वैध खेडाळू प्रमाणपत्रे पडताळणी अहवाल दिल्याशिवाय शासन सेवेत नियुक्ती दिली जाणार नाही.

३ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे दिनांक ०१ जुलै, २०१६, १८ ऑगस्ट, २०१६, ३० जुन, २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच, वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

oin Megabharti_7500

**८. दिव्यांग आरक्षण**

१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६, दिनांक २९ मे, २०१९ अन्वये या संदर्भात शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२ कृषि, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण १५२०/प्र.क्र.११३/६ अे, दिनांक १८ मे, २०२१ नुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार या विद्यापीठातील आस्थापनेवरील पदे दिव्यांग शासन सेवेसाठी सुनिश्चित केली आहेत. त्यानुसार उमेदवार संबंधित पदासाठी अर्ज करण्यात पात्र राहतील.

३ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे प्रमाण किमान ४० टक्के दिव्यांगत्व असलेले प्रमाणधारक उमेदवार आरक्षाणासाठी तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतींसाठी पात्र राहतील. दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवलेले आरक्षण समांतर आरक्षण आहे. तथापी, दिव्यांग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीपुर्वी तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करू शकेल असे प्रमाणपत्र दिल्यावरच त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

४ दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनाक २७ जुन २०२४ अन्वये दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card - UDID) असणे बंधनकारक आहे.

५ लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या उमेदवारांना अर्जामध्ये नमुद केलेला दिव्यागंत्वाचा प्रकार/उपप्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

६ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकुण पदसंख्येपैकी असतील, तसेच दिव्यांग शिफारस उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

७ प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विद्यापीठाकडे लेखी विनंती करून पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच विद्यापीठाची विहित पध्दतीने पुर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

८ उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व त्याच्या मानधनाची व्यवस्था करावी. संबंधित लेखनिकाच्या परिक्षा केंद्रावरील उपस्थितीबाबची

1

जबाबदारी उमेदवाराची राहील. लेखनिक उपस्थित नसल्याच्या कारणास्तव ऐनवेळी लेखनिकाची व्यवस्था विद्यापीठामार्फत केली जाणार नाही. तसेच, लेखनिक म्हणुन मदत देणारी व्यक्ती एकाच परीक्षेसाठी एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणुन काम करणार नाही याची दक्षता उमेदवाराने घ्यावी.

९ लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. लेखनिक व उमेदवार यांच्या मधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोत्याही प्रकार भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांनाची एकाग्रता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१० लेखनिकाने स्वतः प्रश्न सोडवू नये अथवा उमेदवारास कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन वा सुचना करू नयेत. उमेदवाराकडुन तोंडी सुचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमुद करणे एवढेच आवश्यक राहील उमेदवार व लेखनिक या दोघांची नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडविली असल्याचे निष्पन्न झाल्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारी रद्द केली जाईल.

**९. अनाथ आरक्षण**

१ अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्र.१२२/का ०३, दिनांक ६ एप्रिल २०२३ तसेच या संदर्भात शासनाकडुन वेळोवेळी पारीत करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातुन करण्यात येईल.

**१०. माजी सैनिकांकरीता आरक्षण**

१ माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील.

२ शासन निर्णय राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५ जानेवारी, २०२४ नुसार समांतर आरक्षणासाठी राखुन ठेवलेल्या जागेवर सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गात गुणवत्तेवर देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

oin Megabharti _7500

**११. भुकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण**

१ भुकंपग्रस्त आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील.

२ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ तसेच, यासंदर्भात शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार भुकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. भुकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाही, तर ती पदे अन्य पात्र प्रकल्पग्रस्तांमधुन भरण्यात येतील.

**१२. पदविधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी**

१ शासकीय कार्यालयात तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेले पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार यांचेकडे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

२ सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अंशका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ नुसार पदविधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांमधुन शासकीय/निमशासकीय सेवेतील नियुक्तीसाठी असलेले १० टक्के आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे या घटकासाठी जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षित पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधुन भरण्यात येतील.

**१३. अर्ज भरण्याकरीता आवश्यक सुचना / सर्वसाधारण अटी व शर्ती**

१ विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उमेदवारांना सदर सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधित उमेदवारांने दिनांक ३१.०३.२०२५ रोजी वैध असलेल्या किंवा अर्ज सादर करण्याचे दिनांकास वैध असलेले नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो

१ ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ विहित करण्यात आलेली प्रमाणपत्र, अर्ज करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील. अद्ययावत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र दिनांक ३१.०३.२०२५ रोजी वैध असलेल्या किंवा अर्ज सादर करण्याचे दिनांकास वैध असलेले नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ठ प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

३ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणीबाबत म.शा. इतर मागास बहूजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र संकीर्ण २०२१/प्रक्र.२९७/मा.व.क. दिनांक २६.०४.२०२२ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल.

४ विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेडाळू, अनाथ इत्यांदीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहिल.

५ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतर परिवर्तनीय असुन आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

६ अर्ज करतांना एखादी जात/जमात राज्य शासनाकडुन आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केले असल्यास तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवारांकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

७ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण -१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५ जानेवारी, २०२४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

oin Megabharti_7500

८ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. यासाठी शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास (Domicile Certificate) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सर्वसाधारण रहिवासी संज्ञेला भारतीय लोक प्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

९ समांतर आरक्षणा अंतर्गत निवड झाल्यास सक्षम प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र पडताळणी झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

१० मागासवर्गीय उमेदवारांना संबंधित आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास विहित प्राधिका-याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकावर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एस.एल.पी. मधील आदेशाच्या अधिन राहुन तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१२ उमेदवाराने (विवाहित अथवा अविवाहित) नियुक्तीच्या वेळी लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करतांना दोनपेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळेस हयात असल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल. शासकीय सेवेत नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोन किंवा अधिक अपत्ये हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

१३ निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे सक्षम अधिकारी यांचेकडील मुळ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणा-या अधिकारी यांचे कार्यालयाकडुन पडताळणी करून घेतले जाईल. सदर प्रमाणपत्र पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालानुसार नियुक्ती आदेश देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

1

१४ उमेदवारास एकापेक्षा अधिक संवर्गासाठी अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र ऑनलाईन अर्ज सादर करावा लागेल. त्यासाठी स्वतंत्र ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

१५ राज्य शासकीय, निमशासकीय कृषि विद्यापीठ कर्मचारी/स्थानीक स्वराज्य संस्था इत्यादीमध्ये कायम आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी अर्ज भरतांना संबंधित कार्यालय प्रमुखांचा ना-हरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

१६ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २८.०३.२००५ ची अधिसुचना नुसार उमेदवाराने अर्ज करण्याच्या दिनांकास २८.०३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या व हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक नसावी याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१७ उमेदवाराने ऑनलाईन परीक्षा, व्यावसायीक चाचणी तसेच शाररीक क्षमता चाचणीमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार विचारक्षेत्रातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करीता बोलाविण्यात येईल त्यावेळेस उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करतांना जी कागदपत्रे सादर केलेली आहेत तीच कागदपत्रे ग्राहय धरण्यात येतील. त्याबाबत वेळोवेळी संकेतस्थळावर सुचना निर्गमित करण्यात येईल. सदर कागदपत्र पडताळणीकरिता बोलविण्यात आल्यास निवड झाली असा उमेदवाराला दावा करता येणार नाही.

१८ उमेदवारांना लेखी परिक्षा, शाररीक क्षमता, व्यावसायीक चाचणी, तसेच कागदपत्र पडताळणीकरीता स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१९ जाहिरातीचा अर्ज स्विकृतीची अंतिम **दिनांक १०.०४.२०२५** पर्यंत राहील. त्याचप्रमाणे अंतिम दिनांकापर्यंत वैध असलेली कागदपत्रे ग्राहय धरण्यात येतील.

२० उमेदवारास मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

२१ उमेदवारा विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखादया प्रकरणात फौजादारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी. खरी माहिती दडवुन ठेवल्यास, प्रशासनाचे निदर्शनास आल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारास नियुक्ती अपात्र ठरविण्यात येईल.

oin Megabharti_7500

२२ उमेदवाराने नावातील बदलाबाबत राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२३ भरती प्रक्रिये दरम्यान जर एखादया उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळुन आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

२४ जाहिरातीतील कोणत्याही पदावर निवड करून घेण्यासाठी उमेदवाराने अयोग्य मार्गाचा अवलंब केल्यास संबंधित उमेदवाराला भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

२५ वरील वेळापत्रकामध्ये काही बदल झाल्यास, सुधारित वेळापत्रक वृत्तपत्राव्दारे व विद्यापीठाच्या **www.pdkv.ac.in** संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

२६ परिक्षा शुल्क ऑनलाईन अर्ज भरतांना दिलेल्या सुचनांनुसारच भरण्यात यावे.

२७ भरतीप्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी संकेतस्थळ पाहून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२८ सदर जाहिरात ही केवळ डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला प्रकल्पबाधितांकरीता निर्गमित करण्यात येत असून इतर प्रकल्पातील कुठल्याही प्रकल्पबाधित व्यक्तींनी सदर जाहिरातीमध्ये अर्ज करू नये. अर्ज केल्यास तो ग्राहय धरल्या जाणार नाही.

सदर जाहीरात मा. कुलगुरू महोदय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

oin Megabharti _7500